आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २८४ वा ● शनिवार दि. ३० मार्च २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


### जळगाव जिल्ह्यातील सहाय्यकारी मतदान केंद्राच्या प्रस्तावास भारत निवडणूक आयोगाची मान्यता प्रदान

जळगाव ( जिमाका ) :– जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर जळगाव व रावेर लोकसभा मतदारसंघातील १८ सहाय्यकारी मतदान केंद्रांना भारत निवडणूक आयोगाने मान्यता प्रदान केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील सहाय्यकारी मतदान केंद्रांच्या प्रस्तावास भारत निवडणूक आयोगाने मान्यता प्रदान केली आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जिल्ह्यात मतदान केंद्राच्या सुसूत्रीकरणाचा कार्यक्रम राबविण्यात आला होता, त्यानुसार ज्या मतदान केंद्रास जोडलेल्या मतदारांची संख्या १५०० पेक्षा अधिक होती तिथे सहाय्यकारी (अतिरिक्त) नवीन मतदान केंद्र प्रस्तावित करण्यात आले. तसेच मतदान केंद्राच्या ज्या इमारती नादुरुस्त होत्या किंवा त्यांची पडझड झाली होती. अशा मतदान केंद्राऐवजी नवीन मतदान केंद्र प्रस्तावित केले होते.

# नांदेड लोकसभा मतदार संघात काँग्रेसचाच झेंडा फडकेल - वसंतराव चव्हाण

भोकर / सिद्धार्थ जाधव /नांदेड जिल्ह्यातील मतदार अशोकराव चाव्हण यांना फुला सारखं जपल परंतु त्याच मतदारांचा विचार त्यांनी केला नाही. लोकशाही मध्ये जनताच नेत्यांना मोठं करते. जनता ज्यांना मोठं केली तेच आज ईडी च्या भीतीने स्वतःच्या स्वार्थासाठी हे नेते जनतेला बेईमान झाले. विरोधाकांचा आवाज दाबण्यासाठी सत्तेचा गैरवापर करून, दडपशाहीचा वापर करून त्यांना ईडीची भीती दाखवून जेल मध्ये टाकले जात आहे. हे भाजप लबाडाच सरकार आहे. यांचा हा डाव मतदारांना कळला असून नांदेड लोकसभा मतदार संघात केवळ काँग्रेसचाचा झेंडा फडकेल. देशातील महागाई शिगले पोहचली, तरुणांयीतील बेकारी वाढली. या देशाला वाचवान्यासाठी,दडपशाहीला दूर करायच असेल आणि लोकशाहीला बळकट करायचे असेल तर या लबाड धोकेबाज भाजपला या देशातून हद्दपार केलं पाहिजे असे बोलून मला मोठ्या मतांधिक्याने विजयी कराल असे आव्हानही यावेळी नांदेड लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे काँग्रेस प्रणित अधिकृत उमेदवार मा. आ. वसंतराव चव्हाण यांनी केले आहे.

.नांदेड काँग्रेस मधील फुटीनंतर ही लोकसभा निवडणुकीला अधिक सक्षमपणे नांदेड काँग्रेस तयार होत असून महाविकास आघाडीच्या वतीने नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी माजी आ. वसंतराव चव्हाण यांना उमेदवारी जाहीर




झाल्यानंतर महाविकास आघाडीच्या वतीने विधानसभा तसेच तालुका निहाय दौरे व कार्यकर्त्यांची बैठक संवाद मेळावे घेतले जात आहेत त्याच अनुषंगाने भोकर येथे दिनांक २९ रोजी दुपारी ३ वाजता माऊली मंगलकार्याल ठिकाणी कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीला संबोधित करताना नांदेड लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे काँग्रेस प्रणित अधिकृत उमेदवार तथा माजी आ. वसंतराव चव्हाण म्हणाले.

यावेळी बी आर कदम बोलताना म्हणाले की,भाजप देशातील दलित,मुस्लिम बहुजनांना वेगळ्या दृष्टीने बघत आहे.देशाची लोकशाही बळकट करायची असेल तर भाजप ला देशातून घाद्दपार केलं पाहिजे. करिता काँग्रेच्या वसंतराव चव्हाण यांना विजयी करून यांचे हात बळकट केले पाहिजे असे आव्हान कदम यांनी केले आहे.

शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष बबनराव बारसे म्हणाले की भोकर मतदार संघातील जनता ही आता जागरूक झाली असून येथील मतदार शब्दला जपणारा आहे. काँग्रेस मधील कार्यकर्त्यांना संपवण्याचा काम अशोक चव्हाण यांनी केल. ज्या मतदारांनी अशोकरावांना मोठ केलं त्याच मतदारांना त्यांनी दगा दिला आता हेच मतदार त्यांचा हिशोब करतील.

यावेळी माधवराव पाटील शेळगावकर,काँग्रेस तालूकाध्यक्ष गोविंद बाबा गौड पाटील ,महिला जिल्हाध्यक्ष रेखा ताई चव्हाण, मा.जीप.सदस्य प्रकाशराव भोसीकर,मा. सभापती बाळासाहेब रावणगावकर, माधवराव पाटील मातुळकर,प्रवक्ता बालाजी गाडे,पप्पू कोंडेकर,राष्ट्रवादी काँग्रेसचे ॲड शिवाजी कदम,काँग्रेस चे शहराध्यक्ष तौसीफ इनामदार, शिवाजी पाटील लगलूदकर आदिन्सह काँग्रेस,राष्ट्रवादी,शिवसेना पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठीकचे सूत्रसंचालन माधवराव शिंदे तर उपस्थितांचे आभार काँग्रेस शहराध्यक्ष तौसिफ़ इनामदार यांनी केले.

### राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जबाबदारीने प्रशिक्षण घ्या – जिल्हाधिकारी अभिजित राऊत

नांदेड : प्रत्येक मतदान अधिकारी व कर्मचारी यांनी 'चुनाव का पर्व, देश का गर्व 'या भावनेने राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जबाबदारीने प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.



प्रत्यक्ष मतदान केंद्रावरील येऊ घातलेल्या समस्या कोणत्या असू शकतात, याचाही प्रशिक्षण घेताना विचार करून आलेल्या समस्यांचे निराकरण प्रशिक्षणाच्या माध्यमातून पूर्ण केल्यास मतदान घेणे अधिक सोयीचे व सोपे होते, असे प्रतिपादन निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी केले. नांदेड लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या ०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाच्या प्रथम प्रशिक्षणात केले आहे.

### मतदारांनो,मतदानाचा हक्क बजावा!

नागपूर : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा आणि मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या



दृष्टीने मतदार जागरुकता आणि सहभाग कार्यक्रम (स्वीप) अंतर्गत जिल्ह्यामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने मतदान करीत 'मिशन डिस्टींक्शन 'यशस्वी करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केले आहे.

स्वीपअंतर्गत मतदार जनजागृतीच्या अनुषंगाने कळमेश्र्वर येथे सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले तसेच बाजार चौकात पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. कस्तुरबा गांधी विद्यालय अडम, अशोक विद्यालय उमरेड, विश्र्वव्यापी विद्यालय वेलतुर येथेही विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मतदार जागृती रॅली, पोस्टर स्पर्धा, मतदार जनजागृती शपथ अशोक विद्यालय उमरेड येथे घेण्यात आली. पंचायत समिती हिंगणा अंतर्गत सातगाव येथे बचत गटाच्या महिलांनी होळीनिमित्त मतदान जनजागृती करण्यात आली. जिल्ह्यातही विविध ठिकाणी मतदान जनजागृती करण्यात येत आहेत. यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन येत्या काळात करण्यात येणार आहे.

### अमरावती येथे स्वीप उपक्रमाअंतर्गत नवमतदारांसाठी जनजागृती शिबीर

अमरावती, (जिमाका): अमरावती विधानसभा मतदार संघामार्फत तहसील कार्यालयाच्या सभागृहात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप उपक्रमाअंतर्गत नवमतदार जागृती व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यावेळी मतदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगून निवडणुकीत मतदार स्वयंसेवक म्हणून कार्य करण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी केले.

मार्गदर्शन शिबिराला नवयुकांची मोठ्या प्रमाणावर हजेरी होती. यावेळी सहायक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी मीनू पी. एम., मुख्याधिकारी नगरपंचायत तिवसा नरेश अकनुरी, उपमुख्य कार्यापालन अधिकारी डॉ.कैलास घोडके, उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अनिल भटकर, तहसिलदार विजय लोखंडे, महानगरपालीकाचे सीडीपीओ नरेद्र वानखडे आदी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी तसेच स्पर्धा परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षेच्या तयारीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनीही मोठ्या प्रमाणावर प्रश्नोत्तराच्या माध्यमातून मान्यवरांशी संवाद साधला. उपमुख्य कार्यापालन अधिकारी डॉ.कैलास घोडके यांनी सर्वाना मतदानाची शपथ देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. निवासी नायब तहसिलदार सुनिल रासेकर यांनी प्रास्ताविक केले.

## ''वंचितच्या पाठीत खंजीर खुपसला'', प्रकाश आंबेडकरांच्या आरोपांवर संजय राऊत म्हणाले, ''आम्ही आता त्यांनाः

**मुंबई : वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडत 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. तर दुसऱ्या बाजूला, शिवसेनेच्या ठाकरे गटातील खासदार आणि महाविकास आघाडीचे नेते संजय राऊत सातत्याने दावा करत आहेत की आम्ही (मविआ) वंचित बहुजन आघाडीला आमच्याबरोबर घेण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. तसेच प्रकाश आंबेडकर यांच्यावर आमचा विश्वास आहे. आमचे आणि त्यांचे विचार सारखेच आहेत. आम्हाला आणि आंबेडकरांना देशाचं संविधान वाचवायचं आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे भाजपाला मदत होईल असं वागणार नाहीत. आमची प्रकाश आंबेडकरांशी अजूनही चर्चा चालू आहे.**

संजय राऊत अजूनही आघाडी मजबूत असल्याचा दावा करत असतानाच प्रकाश आंबेडकर यांनी थेट संजय राऊत यांनाच लक्ष्य केलं आहे. आंबेडकरांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक फोटो शेअर केला आहे. यामध्ये संजय राऊत वंचित बहुजन आघाडीच्या पाठीत चाकू खुपसत आहेत असं चित्र दाखवण्यात आलं आहे. तसेच त्यांनी म्हटलं आहे की, संजय राऊत, तुम्ही किती खोटं बोलणार? तुम्ही म्हणताय की तुमचे आणि आमचे विचार एकसारखे आहेत तर मग तुमच्या बैठकांमध्ये तुम्ही आम्हाला का बोलवत नाही? ६ मार्च रोजी फोर सीझन्स हॉटेलमध्ये झालेल्या बैठकीनंतर तुम्ही आमच्या कोणत्याही प्रतिनिधीला आमंत्रित का केलं नाही? तुम्ही आजही वंचितला आमंत्रित न करता बैठक बोलावली आहे, आमच्याशिवाय बैठक का करताय? तुम्ही तर मित्राच्याच पाठीत खंजीर खुपसण्याचं काम केलं आहे. सिल्व्हर ओकवर झालेल्या बैठकीत तुम्ही काय भूमिका घेतली होती ते आम्हाला माहिती आहे. अकोल्यात आमच्याविरोधात उमेदवार उभा करण्याबाबत तुम्ही मुद्दा उपस्थित केला होता हे खरं नाही का? एका बाजूला आघाडी बनवत असल्याचं चित्र निर्माण करताय आणि दुसऱ्या बाजूला आम्हालाच पाडण्याचा कट रचताय.

प्रकाश आंबेडकर यांच्या या आरोपांना संजय राऊत यांनी आज (२९ मार्च) प्रत्युत्तर दिलं. राऊत यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, आमची लढाई ही संविधानाच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांच्या विरोधात आहे. प्रकाश आंबेडकर जे काही बोलत आहेत त्याच्याशी माझा काहीच संबंध नाही. आम्ही महाविकास आघाडी म्हणून एकत्र बसलो. प्रकाश आंबेडकर आणि त्यांच्या पक्षाच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली. अनेक बैठका केल्या, या बैठकांमध्ये वंचितचे प्रतिनिधी आणि काही वेळा स्वः प्रकाश आंबेडकर उपस्थित होते. आम्ही आता प्रकाश आंबेडकर यांना लोकसभेच्या पाच जागा देण्याचा प्रस्ताव दिला आहे. आता त्यावर प्रकाश आंबेडकर यांनी निर्णय घ्यायचा आहे.

संजय राऊत म्हणाले, प्रकाश आंबेडकर कालपर्यंत नाना पटोलेंवर आरोप करत होते. आता माझ्याबद्दल बोलतायत, त्यांना आता मी काय बोलणार, परंतु, मला विश्वास आहे की प्रकाश आंबेडकर संविधानाच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांच्या बाजूने जाणार नाहीत. त्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत करणार नाहीत. महाविकास आघाडीने आतापर्यंत प्रत्येक बैठकीत प्रकाश आंबेडकर आणि त्यांच्या पक्षाला आमंत्रित केलं आहे. तुम्ही माध्यमांनीदेखील ते पाहिलं असेल की अनेक बैठकांनंतर वंचितच्या नेत्यांनी आणि प्रकाश आंबेडकर यांनी स्वतः तुमच्याशी बातचीत केली आहे. त्यांचा पक्ष केवळ काल (२८ मार्च) झालेल्या बैठकीत सहभागी झाला नाव्हता. परंतु, त्या बैठकीतही त्यांच्याविषयी चर्चा झाली. प्रकाश आंबेडकरांसाठी आणखी जास्त काय करता येईल यावरही चर्चा करण्यात आली.

## केंद्रात कॅबिनेट, राज्यात मंत्रिपद,विधानसभेत जागा, महामंडळांमध्ये वाटा, आठवलेंनी फडणवीसांकडे काय काय मागितले?

मुंबई, : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. फडणवीसांच्या भेटीनंतर रामदास आठवलेंनी महायुतीकडील मागण्यांची यादीच वाचून दाखवली आहे. केंद्रात कॅबिनेट, राज्यात मंत्रिपद,विधानसभेत जागा, महामंडळांमध्ये वाटा आणि इतर सत्तापदांमध्ये वाटा मिळावा, असं रामदास आठवले म्हणाले. ते मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

रामदास आठवले म्हणाले, लोकसभेची जागा नाही तर केंद्रात कॅबिनेट, राज्यात मंत्रिपद आणि विधानसभेत जागा, महामंडळे आणि इतर सत्तापदांमध्ये वाटा मिळावा. आम्ही एनडीए सोबतच आहोत, ईशान्य मुंबईची जागा जिंकू शकलू असतो. रिपाईच्या अडचणी दूर करण्यासाठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

पुढे बोलताना रामदास आठवले म्हणाले, दोन मित्रपक्ष आल्याने आमची अडचण झाली आहे. आम्हाला जागांवर पाणी सोडावं लागलं तरी आम्ही पाणी अडवणारे लोक आहोत. पाणी वाहून जाणार नाही याची आम्ही काळजी घेऊ. शिर्डीची जागा मिळायला हवी होती, मिळाली नाही, पण शिर्डीपेक्षा महाराष्ट्रातून ४५ जागा निवडून आणणं आवश्यक आहे. एकनाथ शिंदे अजित पवारांचे अभिनंदन ते मोठी रिस्क घेऊन आमच्यासोबत आले आहेत.

आठवले म्हणाले, पवारांना धक्का देऊन अजितदादा आले, उद्धव ठाकरेंना धक्का देऊन शिंदे आले. केंद्रात कॅबिनेट मंत्रिपद मिळालं तर बहुजन समाज समाधानी राहिल. मोदींच्या नेतृत्वात देश जिंकायचा आहे, आपली ताकद आवश्यक असल्याचे फडणवीस म्हणाले. आमची नाराजी दूर झाली, दिलेला शब्द पाळतील असं वाटतंय. जानकर आमचे मित्र, त्यांचं अभिनंदन, मी प्रचाराला जाणार आहे. ते पवारांना भेटून आले, जानकर तिकडं जाऊ नयेत म्हणून फडणवीसांनी त्यांना जागा दिली. देवेंद्र फडणवीस हुशार राजकारणी झालेत. मी पवारांकडे गेलो असतो तर मला जागा मिळाली असती, मी प्रामाणिक आहे, असंही रामदास आठवले यांनी स्पष्ट केलं.

मी भाजपसोबत असल्याने दलित– बौद्ध मतं भाजप आणि महायुतीलाच मिळतील

भाजपविरोधात अनेक आघाड्या आहेत, त्यांना पिछाडीवर टाकण्याची आमच्यात ताकद आहे. प्रकाश आंबेडकर यांचा महाविकास आघाडीने अपमान केला. दिलेला शब्द पाळला नाही, शिवसेनेने जागा दिल्या नाहीत. त्यांनी स्वबळावर लढावे. ते भाजपविरोधात लढले तरी मी भाजपसोबत असल्याने दलित– बौद्ध मते भाजप आणि महायुतीलाच मिळतील हे नक्की, त्यांनी त्यांचा प्रयत्न करावा, असे रामदास आठवले यांनी स्पष्ट केले.

## मराठवाड्यातील लोकसभेच्या अधिक जागा महाविकास आघाडीच्या निवडून येतील, अमित देशमुख

**लातूर : महाराष्ट्र राज्याचे नाव सध्याच्या राजकारणामुळे डागावलेल आहे ते आपणाला पुसून टाकायचे आहे. महाविकास आघाडीचा विचार समतेचा, बंधुभावाचा, प्रगतीचा सर्वांच्या सुरक्षिततेचा आहे, त्यामुळे मराठवाड्यातील महाविकास आघाडीच्या लोकसभेच्या अधिक जागा निवडून येतील, अशी ग्वाही राज्याचे माजी वैदिकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिली.**

लातूर लोकसभेचे इंडीया (महाविकास) आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ शुक्रवार दि. २९ मार्च रोजी दुपारी लातूर शहरातील जुना औसा रोडवरील प्रा संजय जगताप यांच्या




निवासस्थानी भेट देऊन उपस्थित महाविकास आघाडी काँग्रेस कार्यकर्त्यांशी संवाद साधला, या प्रसंगी आमदार अमित देशमुख बोलत होते.

यावेळी बोलतांना माजी मंत्री आमदार देशमुख म्हणाले की, समाजामध्ये कार्यरत असणाऱ्या व्यक्तीला संधी मिळते, आपण सारेच लोकसभेचे उमेदवार आहोत असे समजून मतदारापर्यंत डॉ. शिवाजी काळगे यांना पोहोचवावे. काँग्रेस पक्षाचे चिन्ह हात आहे, हे ही लोकांना सांगावे, मतदारांना आता पर्याय हवा आहे, ते सुज्ञ आहेत. देशाच सर्वोच्च कायदेमंडळ लोकसभा आहे. लोकसभेत सत्ता पक्षाच्या खासदाराने काहीच प्रश्न मांडले नाहीत, कोणत्या चर्चेत त्यांनी सहभाग घेतला नाही, मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचे भूमिपूजन २०१४ मध्ये झाले या कामाबद्दल या खासदारांनी लोकसभेत कधी प्रश्न विचारला नाही, असे त्यांनी सांगितले यावेळी बोलतांना सांगीतले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, लोकसभेत खूप मोठी संधी असते, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी लातूर जिल्ह्यात डिझास्टर मॅनेजमेंट युनिट, बीएसएफ केंद्र आणले. लोकनेते विलासराव देशमुख यांनी लातूर जिल्ह्यात रेल्वे आणली, विमानतळ केले, उडान योजनेअंतर्गत लातूरच

विमानतळ सुरू होईल, वंदे भारत ट्रेन ही सुरू झाली पाहिजे, लातूर – पुणे इंटरसिटी कायम राहिली पाहिजे, महिलांचे, शेतकऱ्यांचे, बेरोजगाराचे प्रश्न सोडवण्यासाठी महाविकास आघाडी काँग्रेसचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना निवडून द्या असे ते म्हणाले. लातूर हे मिनी कोटा आहे, येथून सोळाशे डॉक्टरचे डमिशन झाले लातूरच्या काम करण्याच्या परंपरेचा आलेख डॉ. काळगे यांच्यामुळे आणखी उंचावेल, जनतेच्या जीवावरच आम्ही राजकारण करतो, काम करणाऱ्याची जनता नोंद घेते जनतेनेही आम्हाला आशीर्वाद दिले असे त्यांनी यावेळी आर्वजून सांगितले.

महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, लातूर लोकसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावरील उत्साह बघून आम्हीही उत्साहाने काम करत आहोत. महाविकास आघाडीच्या घटकांसोबत समन्वय राखून ही निवडणूक आपणाला जिंकायची आहे, पाठीमागे जनता फसव्या जाहिरातीला फसली, ती आता फसणार नाही. मी २६ वर्षापासून २४ तास जनतेच्या सेवेत आहे, पुढेही असे २४ तास जनतेच्या सेवेत कायम राहील त्यामुळे सर्वांनी मला प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संजय जगताप यांनी केले, तर संजय निलेगावकर, प्रा श्री भुसने यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यशवंत वाडीकर यांनी केले, तर शेवटी आभार श्री शास्त्री यांनी मानले.




आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक – महाविकास आघडीतून वंचितचे ॲड. प्रकाश आंबेडकर बाहेर पडले, महायूतीतील केंद्रीय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन नेते रामदास आठवले हे नाराज आहेत ही राजकीय पक्षाची चूक आहे की आंबेडकरी विचारधारेतील नेतृतवाची गफलत आहे हेच कळत नाही. डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, समाजकारण, राजकारण, सत्ताकारण हे विचित्र, आपमतलबी असते, ते विचारधारेवर नसतेच. समान हक्क, न्याय व अधिकाराबद्दल राजकारणात वाव नसतोच. ज्याच्या हाती काठी त्याचीच म्हैस अशी एक कहावत आहे. त्याचेच हे प्रतिक ठरावे, विनाकारण बडबड करु नकोस.

एक – अहो, वंचितच्या ॲड. प्रकाश आंबेडकर यानी पत्रकार परिषदेत, महाविकास आघाडीच्या बैठकीत भाजपा, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ, नरेंद्र मोदी का नकोत याबद्दल भुमिका स्पष्ट केली असतानाही त्यांचे विचार मान्य केले गेले नाहीत. रामदास आठवले यांचे जाऊ द्या, ते भाजपा, मोदी यांच्या ताटाखालचे मांजर झाले आहेत पण ॲड. आंबेडकर यांचे बद्दल असे घडायला नको होते.

दुसरा – अरे, लोकसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच वंचितच्या ॲड. प्रकाश आंबेडकर यानी उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेशी गठबंधन केले होते. मग महाविकास आघाडीतून ॲड. आंबेडकर याना ठाकरेच्या कोट्यातूनच जागा मिळणार हे गृहीत असताना वेगळा गट म्हणून जास्तीच्या जागा ठाकरे सेना, मित्र पक्ष मग ॲड. प्रकाश आंबेडकर यांचीच चलती कशी राहील म्हणून ते वेगळे झाले असतील.

एक – अहो, पण भाजपा हटाव, मोदी हटाव मोहीम यशस्वी करायची असेल तर वंचित आघाडीची ॲड. प्रकाश आंबेडकर यांची गरज भासतेच हे शरद पवार, सोनिया गांधी, ठाकरे याा कळले नसेल काय याचे आश्चर्य वाटते.

दुसरा – अरे, मळात नेहमीच प्रकाश आंबेडकर याची निवडणूक रणनिती ही भाजपाधार्जीणीच राहीलेली आहे पण काळ बदलतो आहे, वेळ गेली नाही तडजोड होईलच अशी लोकभावना व्यक्त होत आहेच पण दलित, मुस्लिम, बहूजन कोणाचेही हस्तक राहीलेले नाहीत. हेच ॲड.आंबेडकर, आठवले व राजकीय पक्षनेत्यानी लक्ष्यात ठेवावे एवढेच.

## काय बोलता राव ?

काय बोलावे तेच कळत नाही. शरद पवार यांचेमूळै विदर्भासह राष्ट्रीय राजकारणात कार्यरत असलेले प्रफूल पटेल हे विमानभाडे प्रकरणात दोषी होते पण शरद पवार यांचेमूळेच ते तरले होते पण राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या बंडखोरीत अजीत पवार यांचे बरोबर भाजपाच्या फडणवीस यांच्या मांडीला मांडीलावून बसल्याने पटेलाची पाटीलकी शाबूत राहीली आणी विदर्भाचा गड पटेलाच्या हाती आला असेच म्हणावे लागेल.

**काय बोलता राव,**

अरे, घोटाळेबाजच घोटाळेबाजाना साथ देत असतात. प्रफूल पटेल, अजित पवार, छगन भूजबळ, हसन मुश्रिफ, नवाब मलिक हे शरद पवार यांचेमूळे मोठे झाले, आजवर टिकले पण शरद पवार यानी कानाडोळा करताच फडणवीसाचा फडा हाती घेतल्याने ते आज घोटाळ्यातून निर्दोष होत आहेत. त्याच बरोबर नारायण राणे, भावना गवळी, प्रताप सरनाईक हे ही मोकळे होत आहेत. यालाच म्हणतात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा स्वच्छ कारभार, पारदर्शक कारभार, मनकी बात मधील न खांऊगा ना खाणे दुंगा हेच ते काय महासत्ता भारताच सत्ताकारण म्हणावे लागेल मग बोला दाजीबा.

## पाणीटंचाई लक्षात घेता कोरडा व नैसर्गिक रंग खेळावा मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी : शनिवार दि.३० मार्च रोजी लातूर शहर व परिसरात रंगपंचमी साजरी केली जाणार आहे.यावर्षी असणारी पाणीटंचाई लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा अपव्यय करू नये. शक्यतो कोरड्या व नैसर्गिक रंगांचा वापर करून रंगोत्सव साजरा करावा,असे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

दरवर्षी शहरात रंगोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.रंग खेळताना पाण्याचाही मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.अनेक ठिकाणी सार्वजनिकरित्या रंगपंचमी साजरी केली जाते.अशा पद्धतीने रंगपंचमी साजरी करताना पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.अनेक ठिकाणी पाण्याचे टँकरच उभे केले जातात. यावर्षी शहरासह मांजरा प्रकल्प पाणलोट क्षेत्रात अपेक्षित पर्जन्यमान झाले नाही. त्यामुळे लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा प्रकल्पात अत्यंत कमी पाणीसाठा आहे. आजघडीला प्रकल्पात उपलब्ध असणारे पाणी पावसाळ्यापर्यंत जपून वापरावे लागणार आहे. पाऊस कमी झाल्यामुळे भुगर्भातील पाणीपातळी वाढली नाही.परिणामी शहरातील विंधन विहीरींनाही मर्यादित पाणी उपलब्ध आहे.अनेक विंधन विहीरी बंद पडत आहेत. गरजेपेक्षा अधिक वापर किंवा पाण्याचा अपव्यय झाला तर भविष्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांनी रंग खेळताना पाण्याचा वापर करू नये.अनावश्यक पाणी वापरू नये.

## ठसका

असत्य जिंकण्या बेजार झाले  
सत्यावर वार हजार झाले  
सत्ता पिपासू हिटलरशाहीचे  
आता थोतांड अपार झाले  
धर्म अन जात हाच मुद्दा झाला  
लोकांना गंडविणे हा हुद्दा झाला  
लुबाडणे हेच राजकारण्यांचे ब्रीद  
खाबूगिरी करणे एकमेव धंदा झाला  
सत्ता तिथेच शहानपण असते  
सत्तेसाठीच सारी धडपड असते  
आघाडी बिघाडी एकत्र येत मग  
फक्त आश्र्वासानांची बडबड असते

**- विजय वाठोरे, हिमायतनगर नांदेड**  
**९९७५५९३३५९**

# पांगुळीसत्ता काय कामाची !

## संपादकीय...

भारताची आर्थिक घडी रोजगार, कर्मचारी, अधिकारी, उद्योग, व्यवसाय, उत्पादन क्षेत्रातच आधारलेली असते. त्यातून सरकारी ,यंत्रणा, शासन कार्यरत राहत असते. गत दशकातील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाल मन की बात मधून कार्यप्रवाही असली तरी वटहुकूमी कारभारामुळे भारताची आर्थिक परिस्थिती सुधारली, विकास झाला असे म्हटलेच पाहिजे कारण असे-तसे नाही होय म्हटले तर देशद्रोही बडगा आहेच असतोच म्हणून तमाम भारतीय मूगगिळून आजवर टाळ्या-थाळ्या वाजून मेणबत्ती पेटवून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना धन्यवाद देत आले आहेत.

आजघडीला भारतीय लोकशाहीत संविधानाच्या अधीन राहून लोकसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यक्रमाही जाहीर झालेला आहे. पहिला-दुसरा-तिसरा असा निवडणुकीचा टप्पा जाहीर झाला असून भाजपा महायुती आणि इंडिया महाविकास आघाडी अशी लढत होणार असली तरी दोन्ही आघाडीतील उमेदवार संदर्भातले भिजत घोंगडे निर्णायक प्रसंगापर्यंत नसले तरी निवडणुका होणारच ठरल्या असल्याने सर्वपक्षीय नेते आपापल्या आघाडीतून केंद्राची सत्ता हस्तगत करण्यासाठी हातपल्या असल्याचेच चित्र दिसते आहे.

भारतीय सत्ताकारणार साम-दाम-दंड-भेद या संदर्भात विद्यमान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना कोणीही पर्याय देऊ शकत नाही कारण तिसऱ्या कार्यकाळात काय करायचे आहे कसे करायचे आहे ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वैयक्तिकरित्या ठरविलेले आहे. असा राजकीय वर्तुळातला अंदाज बोलतो आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोहन भागवत यांची विचारसरणी आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भाजप कृतीमुळे सर्वकष आर एस एस, भाजपचे ज्येष्ठ नेते-मंत्री, खासदार-आमदार आणि स्थानिक स्वराज्य संस्थेतील कार्यकर्ते कामाला लागले आहेत. तर दुसरीकडे सोनिया गांधी, शरद पवार, मल्लिकार्जुन खरगे, कोठडीतले केजरीवाल, शिवसेनेचे उद्धव ठाकरे ते भारतीय पातळीवर केवळ नरेंद्र मोदी यांचा पाडवा कसा करायचा यात गुंतले असून अंतर्गत मतभेदाकडे दुर्लक्ष करताना दिसत असल्याने जशास तसे स्पर्धक मैदानात असल्याचा अंदाज राजकीय वर्तुळात वर्तविला जातो आहे.

लोकसभा निवडणूक निकालानंतर कोण सत्तेवर येईल कोण विरोध राहतील हे आज स्पष्ट दिसत नसले तरी महायुती आणि महाविकास आघाडीतील तू -तू -मै- मै हेच त्यांचे अडसर ठरतील अशीच प्रसार माध्यमातून चर्चा होताना दिसते आहे यातच प्रसार माध्यमातून अशीही चर्चा होते आहे की लोकसभा निवडणूक काळात काळजी सत्ता काय कामाची अशीच उजळणी होताना दिसते आहे ही बाब चिंताजनक वाटते असे सर्वसामान्य जनतेतून मतप्रदर्शन व्यक्त होताना दिसते आहे.

विद्यमान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे रोखठोक बोलणारे काम करणारे आहेत. कुणी कर्ज बुडावे पळून गेले असले तरी तो ग्रहविभागाचा प्रश्र्न असतो त्यामुळे मोदीजीचा खात असावा असे म्हणता येणार नाही त्यास आम्ही चहाच कारणीभूत असतील ती बाब वेगळी पण भारताला आर्थिकदृष्ट्या शक्तीशाली करायचे असेल तर परदेशी कंपन्यांना भारतात अर्थात महाराष्ट्राच्या भूखंडावर त्यांना गुंतवणुकीच्या नावाखाली उद्योगासाठी करार करायच लागतो ते राजकारण्यांना -प्रसार माध्यमांना कळत नसेल तर त्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा काय दोष असावा अशीही जनसामान्यातून प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे.

विशेष अशी की भारताचे पहिले पंतप्रधान शांत संयमी भाषेत बोलत होते. लालबहादूर शास्त्री कडक असले तरी इंदिरा गांधी खमंग- श्रमकी वजा बोलत होत्या, व्ही.पी. सिंग, मोरारजी देसाई, चंद्रशेखर, अटल बिहारी वाजपेयी, नरसिंहराव, हे कार्याला प्रधान देत होते, राजीव गांधी विज्ञान-तंत्रज्ञानातून विकास साधत होते पण विद्यमान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे त्यांचे कार्य-सुविधा-योजना त्यांच्या आवाजी-एकसुरी वचनातून जनतेला सांगण असताना भाजपाची लोकप्रतिनिधी मंत्रिपद न मिळाल्याने आम्ही होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत तिकीट न मिळाल्याने वाघोली सत्ता काय कामाची असे म्हणत असतील तर रामजाने असेच म्हणावे लागेल असे वाटते.

# कॉंग्रेसला आणखी एक तडाखा! आयकर विभागाकडून तब्बल १,७०० कोटी रुपयांची नोटीस

**नवी दिल्ली :निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस पक्षाला अनेक धक्के बसत असताना त्यातच आणखी एक मोठा झटका बसला आहे. आयकर विभागाने कॉंग्रेस पक्षाला तब्बल १,७०० कोटी रुपयांची नोटीस पाटवली आहे. २०१७-१८ पासून २020-२१ साठीचा दंड आणि व्याज देण्याची मागणी केली आहे. यामुळे कॉंग्रेस पक्षाच्या आर्थिक विवंचनेत वाढ होत आहे. दिल्ली हायकोर्टाने कॉंग्रेस पक्षाची याचिका फेटाळून लावल्यानंतर आता पक्षाच्या अडचणीत भर होत आहे.**

दिल्ली हायकोर्टाने कॉंग्रेसकडून कर अधिकाऱ्यांनी कॉंग्रेस पक्षाच्या विरोधात चार वर्षाच्या कालावधीसाठी कर पुनर्मूल्यांकन कारवाई सुरू केल्याविरोधात केलेल्या याचिका फेटाळून लावल्या आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणूकीपूर्वी कॉंग्रेस पक्षाला तडाखा बसला आहे. आयकर विभागातर्फे पक्षाला तब्बल १,७०० कोटी रुपयांची नोटीस पाठवली असून पुढे रकमेत वाढ होण्याची शक्यता दर्शवली आहे. २०२१-२२ पासून २०२४-२५ चे पुनर्मूल्यांकन करण्यात येत आहे. याची कट-ऑफ तारीख रविवारपर्यंत पूर्ण होईल.

कॉंग्रेसचे वकिल आणि राज्यसभा खासदार विवेक तन्खा यांनी याबद्दल माहिती देताना सांगितले की, याविरोधातील कायदेशीर लढा सुरू राहिल. तसेच त्यांनी आयकर विभागाच्या कारवाईला असंविधानिक आणि चूकीची असल्याचे सांगितले.

गुरुवारी पक्षाला तब्बल १,७०० कोटी रुपयांची नोटीस कुठल्याही कागदपत्रांशिवाय पाठवली आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर देशातील मुख्य विरोधी पक्षाचा गळा दाबला जात असल्याचा आरोप तन्खा यांनी केला आहे.

न्यायमूर्ती यशवंत वर्मा आणि न्यायमूर्ती पुरुषेद्र कुमार गौरव यांच्या खंडपीठाने सांगितलं की, इतर वर्षासाठी पुनर्मूल्यांकन सुरु करण्याच्या कारवाईत हस्तक्षेप करण्यास नकार देणाऱ्या पहिल्या निर्णयानुसार ही याचिका फेटाळली जात आहे. सध्याचे प्रकरण वर्ष २०१७ ते २०२१ पर्यतच्या मुल्यांकनासंबंधित आहे. मागील आठवड्यात फटळण्यात आलेल्या दुसऱ्या याचिकेत कॉंग्रेस पक्षाने २०१४-१५ ते २०१६-१७ मुल्यांकन वर्षासंबंधित पुनर्मूल्यांकन करण्याची कारवाई सुरु करण्याला आव्हान दिले होते. हायकोर्टाने २२ मार्च रोजी ही याचिका फेटाळताना कोर्टाने प्राधिकरणाने प्राथमिकदृष्ट्या पुरेसे आणि ठोस पुरावे सादर कले आहेत, ज्यांच्या पुढील तपासाची आवश्यकता आहे असे सांगितले आहे.

तर या याचिकेत आयकर कायदा कलम १५३ सी अंतर्गत कारवाई ही एप्रिल २०१९ मध्ये चार व्यक्तींवर आधारीत होती आणि ही निश्चित वेळेपेक्षा वेगळी होती, असे कॉंग्रेसने म्हटले होते.

## कौटुंबिक वादातून महिलेसह तीन मुलींची निर्घृण हत्या; घटनेनंतर पती फरार

**मोतिहारी : बिहारमधील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. बिहारच्या मोतिहारीमध्ये एक महिला आणि ३ मुलींसह ४ जणांची निर्घृण हत्या झाल्यानं खळबळ उडालीय. महिलेच्या पतीनं तीन मुली आणि पत्नीची कुऱ्हाडीनं गळा कापून हत्या केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी मृत महिलेचा पती फरार आहे. त्यामुळं या घटनेमागं पतीचा हात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केलाय.**

मोतिहारीमध्ये एकत्र ४ जणांची हत्या : गुरुवारी रात्री घरात काही कारणावरुन वाद झाल्याचं बोललं जातंय. या वादाचा पतीला राग आला. यामुळंच त्यानं हत्याकांड घडविल्याचं बोललं जातंय. रात्री पत्नी आणि मुली झोपेत असताना आरोपीनं त्यांची हत्या केलीय. या हत्येमागचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. हा वाद कशामुळं झाला आणि कशाची चर्चा झाली, हे ही समजू शकलं नाही. मोतिहारीच्या पहारपूर पोलीस स्टेशन हद्दीतील बावरिया गावात ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच डीएसपी रंजन कुमार यांच्यासह अनेक पोलीस ठाण्याचे पोलीस गावात पोहोचले आहेत.

आरोपी पती फरार : एकाच कुटुंबातील ४ जणांच्या हत्येच्या घटनेनं संपूर्ण परिसर हादरलाय. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. फॉरेन्सिक टीमलाही घटनास्थळी पाचारण करण्यात आलंय. पोलीस घटनास्थळी सर्व पुरावे गोळा करत आहेत. प्रथम दर्शनी हे संपूर्ण प्रकरण कौटुंबिक वादाचं असल्याचं बोललं जातंय. मृतांचे मृतदेह शवविच्छेदवनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. पोलिसांचा तपास सुरू आहे. या संपूर्ण खून प्रकरणाची माहिती पोलीस काही वेळात देणार आहेत. त्यानंतर घटनेबाबत अधिक माहिती समोर येणार आहे.

## वंचितला सोबत घेणार नाही? शरद पवारांच्या एका वाक्यामुळे चर्चेला उधाण!

सातारा : लोकसभा निवडणुकीमुळे गेल्या काही दिवसांपासून राज्यातील वातावरण ढवळून निघालं आहे. विरोधी बाकावरील महाविकास आघाडीचे नेते वंचित बहुजन आघाडीला सोबत घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत. वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मात्र आपल्या उमेदवारांची घोषणा करून मविआला मोठा धक्का दिला आहे. असे असले तरी महाविकास आघाडीकडून अजूनही संयमाची भूमिका घेतली जात आहे. दरम्यान, शरद पवार यांनी साताऱ्यातील एका भाषणात या निवडणुकीबाबत एक भाष्य केले आहे. त्यानंतर आता मविआ आणि वंचित यांच्यात पूर्णपणे बिनसले आहे की काय? असे विचारले जात आहे. पुढे बोलताना शरद पवार यांनी महाविकास आघाडीवरही भाष्य केलं. आम्ही एकत्र आलो आहोत. उमेदवारीबाबत आम्ही चर्चा केली, असे शरद पवार म्हणाले. तसेच यावेळची निवडणूक तीन पक्षांनी एकत्र घेऊन लढवायची आहे, असंही शरद पवार म्हणाले. आमची प्रकाश आंबेडकरांसोबत चर्चा चालू आहे, असे महाविकास आघाडीचे नेते सांगत आहेत. मात्र शरद पवार यांनी आपल्या भाषणात बोलताना आम्ही तीन पक्ष एकत्र निवडणूक लढवणार आहोत, असं विधान केलं. पवारांच्या या विधानामुळे महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी (शरद पवार गट), शिवसेना (ठाकरे गट) आणि कॉंग्रेस हे तीन पक्षच महाविकास आघाडीचा भाग असणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पवारांच्या या एका वाक्यामुळे आता वंचितच्या मविआतील समावेशचे प्रयत्न थांबवण्यात आले आहेत का? असेही विचारले जात आहे. दरम्यान, येत्या ३ एप्रिल रोजी महाविकास आघाडीचे तिन्ही घटकपक्ष संयुक्तपणे पत्रकार परिषद घेणार आहेत. यावेळी मविआतर्फे महत्त्वाच्या घोषणा केल्या जाण्याची शक्यता आहे. याच पत्रकार परिषदेत मविआ वंचितच्या समावेशावर शेवटचा निर्णय जाहीर करणार का? असेही विचारले जात आहे.

## दहशतवादाविरुद्ध सर्व राष्ट्रांनी एकत्र यावे

मागील आठवड्यात जगाला हादरवून सोडणाऱ्या दोन मोठ्या घटना घडल्या. या दोन्ही घटना म्हणजे रशिया आणि पाकिस्तानमध्ये झालेला दहशतवादी हल्ला. रशियाच्या निवडणुकीत पुतीन यांचा एकतर्फी विजय झाल्याच्या काही तासातच रशियाची राजधानी असलेल्या मॉस्को शहरात मोठा दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात रशियाच्या १३३ निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागला.

या हल्ल्यात हजारो नागरिक जखमी झाले. इसीस या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. पुतीन यांनी पाचव्यांदा विजय मिळवताच दहशतवाद्यांनी त्यांना ही भेट दिली. रशियात झालेला या भीषण हल्ल्याने संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले कारण इसीसच्या दहशतवाद्यांनी थेट मॉस्को शहरात घुसून हा हल्ला केला. रशियाच्या पोलादी सुरक्षेला भेदून दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याने रशियाच्या सुरक्षेव्यवस्थेवरच प्रश्र्नचिन्ह निर्माण झाले. जर राशिया सारख्या अभेद्य सुरक्षा व्यवस्था असलेल्या देशात इतका मोठा दहशतवादी हल्ला होऊ शकतो तर मग जगातील कोणत्याची देशात घुसून दहशतवादी हल्ला करू शकतात अशीच चर्चा जगभर होऊ लागली आणि त्याची प्रचिती अवघ्या काही दिवसात आली. पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात पाकिस्तानच्या नाविक तळावर दहशतवाद्यांनी हल्ला केला. बलुचिस्तान पाठोपाठ खैबर पखतूनच्या प्रांतात एका प्रकल्पावर देखील दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात तिथे कार्यरत असलेल्या पाच चिनी अभियंत्यांचा मृत्यू झाला. या दोन्ही देशात झालेल्या या दहशतवादी हल्ल्याने जगभर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जगात दहशतवाद पुन्हा डोके वर काढत आहे हेच या हल्ल्याने सिद्ध झाले अर्थात इसीसने केलेला हा काही पहिलाच दहशतवादी हल्ला नव्हता. या आधीही इसीसने अनेक देशात दहशतवादी हल्ले केले आहेत. भारत तर नेहमीच या संघटनेच्या हिट लिस्टवर राहिला आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारतालाच बसली आहे. दहशतवादामुळे भारताने दोन पंतप्रधान गमवले आहेत. भारतावर झालेला २६ / ११ चा दहशतवादी हल्ला तर संपूर्ण जगाने पहिला आहे. भारताला जेंव्हा दहशतवादाची झळ बसली तेंव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले होते मात्र त्यावेळी कोणीही त्याला प्रतिसाद दिला नाही त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले. दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही अमेरिकेसारख्या महासत्तेला देखील दहशतवाद्यांनी तडाखा दिला आहे.

मध्यंतरी काही काळ शांत असलेले इसीसचे दहशतवादी आता पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. इसीसचे दहशतवादी सर्वच देशात दहशतवादी कारवाया करीत आहे. त्यामुळे दहशतवाद ही आता एका देशाची समस्या राहिली नसून ती वैश्र्विक समस्या बनली आहे. दहशतवादापासून कोणताच देश अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे याचा मुकाबला सर्व देशांनी मिळून करायला हवा. जोवर दहशतवादाविरोधात संपूर्ण विश्र्व एक होत नाही तोवर दहशतवादाचा हा भस्मासूर रोखणे कठीण आहे. दहशतवादी म्हणजे मानवतेचे शत्रू आहेत. या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एक होणे ही काळाची गरज आहे.

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुण,९९२२५४६२९५**

## adult BCG Vaccination अभियान दिनांक १ ते २० एप्रिल - विशेष सर्वेक्षण

लातूर : राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत सन २०२५ पर्यंत भारत क्षयरोगमुक्त करण्यासाठी केंद्रशासनाने धोरण निश्र्चित केलेले आहे. याअंतर्गत क्षयरोगाचे रुग्ण कमी करण्यासाठी संशंयीत क्षयरुग्ण लवकर शोधून काढणे, संशंयीत क्षयरुग्णाचे थुंकीनमुने, क्ष-किरण तपासणी करणे, आधुनिक CBN-T / TRUEN-T पध्दतीने थुंकीनमुना तपासणी करणे, क्षयरुग्णास मोफत उपचार करणे, त्यास पोषण आहार उपलब्ध व्हावा यासाठी निक्षय पोषण आहार योजने अंतर्गत मासिक अनुदान देणे, रुग्णांच्या सहवासितांची आधुनिक IGRA तपासणी करुन सहवासितांना प्रतिबंधात्मक उपचार करणे या सद्यस्थितीत राबविण्यात येत असलेल्या पध्दतीशिवाय ICMR यांच्या Effect Of BCG Vaccination -mong Vulnerable -dult Population in Reducing TB Disease a Programmatic Study या प्रकल्पा अंतर्गत भारतामध्ये -वींश्रीं इउत्र तरललळपरींळेप कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.महाराष्ट्रामध्ये देखील हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. लहान वयात घेतलेल्या BCG ची परिणामकारकता वयाच्या १५ वर्षानंतर कमी होत असल्याने adult BCGVaccination अभियान अंतर्गत लोकांची क्षयरोगाविरुध्द प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी व समाजातील नवीन क्षयरुग्ण कमी करण्यासाठी १८ वर्षावरील जोखमीच्या गटातील लोकांना क्षयरोग प्रतिबंधक इउत्र लसीचा एक डोस देण्यात येणार आहे. जोखमीच्या गटामध्ये १८ वर्षावरील मधुमेह असलेले रुग्ण, मागील ५ वर्षातील क्षयरुग्ण, मागील ३ वर्षातील क्षयरुग्णांचे निकटचे सहवासीत, धुम्रपान करणारे, ६० वर्षावरील नागरीक यांचा समावेश करण्यात आलेला आहे.-adult BCG Vaccination अभियान हे माहे मे महीन्यामध्ये राबविण्यात येणार आहे.

तथापि घरोघरी जावुन १८ वर्षावरील जोखमीच्या नागरीकांची माहिती घेण्यासाठी दि १ ते २० एप्रिल २०२४ या कालावधीत संपूर्ण शहरात आरोग्य विभागामार्फत सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येणार आहे व ढइ-थखछ या शासनाच्या ॲप मध्ये लसीकरणाची पुर्व नोंदणी केली जाणार आहे.

# चंद्रपूर येथे सामान्य निरीक्षकांनी घेतला निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा

चंद्रपूर : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने १३-चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी सामान्य निवडणूक निरीक्षक, कायदा व सुव्यवस्था निवडणूक निरीक्षक आणि खर्च निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने सामान्य निवडणूक निरीक्षक लोकेशकुमार जाटव यांनी जिल्ह्यातील तसेच चंद्रपूर लोकसभा मतदार संघातील निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला.



नियोजन सभागृह येथे निवडणुकीशी संबंधित सर्व यंत्रणा तसेच नोडल अधिकाऱ्यांची आढावा बैठक श्री. जाटव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., कायदा व सुव्यवस्था निवडणूक निरीक्षक सुजीत दास, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, सहायक जिल्हाधिकारी (आर्णी) सुहास गाडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, मनपा आयुक्त विपीन पालीवाल आदी उपस्थित होते.

लोकेशकुमार जाटव म्हणाले, निवडणुकीसाठी मतदानाचे साहित्य घेऊन जाताना डिस्पॅच सेंटरमध्ये आवश्यक प्रमाणात मनुष्यबळ ठेवावे. तसेच संबंधित यंत्रणेतील अधिकारी व कर्मचा-यांना वैयक्तिक मॅसेज जाणे आवश्यक आहे. मतदान झाल्यानंतर ईव्हीएम गोळा करताना अतिशय दक्ष राहावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी सादरीकरण करताना जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी, जिल्ह्याचा आढावा, मतदान प्रक्रियेमध्ये असलेले मनुष्यबळ व्यवस्थापन, अधिकारी-कर्मचा- यांचे प्रशिक्षण, साहित्य व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था, मतदान यंत्र सुरक्षा व व्यवस्थापन, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, निवडणूक खर्च व्यवस्थापन, मतपत्रिका, पोस्टल बॅलेट, मतदार मदत केंद्र, तक्रार निवारण केंद्र, सी - व्हीजील प, ८५ वर्षांवरील व्यक्तींना तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांग असलेल्या व्यक्तींना गृहमतदानाची सुविधा आदींबाबत निवडणूक निरीक्षकांना माहिती दिली.

बैठकीला सर्व उपविभागीय अधिकारी, नोडल अधिकारी व विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

# गरोदरपणात या तीन आजारांचा धोका सर्वाधिक, जाणून घ्या प्रतिबंधाच्या पद्धती

गरोदरपणात महिलांनी त्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी. कारण या काळात त्यांची प्रतिकारशक्तीही खूप कमकुवत होते. त्यामुळे महिलांना अनेक आजारांचा धोका असतो. डॉक्टर सांगतात की गरोदरपणात महिला कोणत्याही प्रकारच्या संसर्गाला सहज बळी पडतात. यापैकी, असे तीन रोग आहेत, ज्यांची लागण होण्याची शक्यता जास्त असते.



महिलांनी गरोदरपणात त्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे ज्येष्ठ डॉक्टर सांगतात. या काळात कोणताही संसर्ग धोकादायक रूप धारण करू शकतो. अशा परिस्थितीत रोग आणि त्यांची लक्षणे यांची माहिती असणे आवश्यक आहे. असे तीन आजार आहेत ज्यासाठी सतर्क राहणे आवश्यक आहे. चला जाणून घेऊया गरोदरपणात कोणत्या आजारांचा सर्वाधिक धोका असतो.

मधुमेह

गरोदरपणात मधुमेह होण्याचा धोका जास्त असतो. असे घडते कारण काही महिलांमध्ये इन्सुलिन योग्य प्रकारे तयार होत नाही, ज्यामुळे साखरेची पातळी वाढते आणि मधुमेहाचा धोका असतो. अशा परिस्थितीत महिलांनी गरोदरपणात शुगर लेव्हल तपासत राहावे. जर ते वाढत असेल, तर डॉक्टरांशी संपर्क साधावा.

अशक्तपणा

गरोदरपणात खाण्यापिण्याची काळजी न घेतल्यास महिलांमध्ये ॲनिमिया होऊ शकतो. या समस्येचा मुलाच्या आरोग्यावरही परिणाम होतो. अशा परिस्थितीत महिलांनी आपल्या आहाराची काळजी घेणे गरजेचे आहे. खाण्यापिण्याच्या बाबतीत बेफिकीर राहू नका. तुमच्या रक्ताच्या चाचण्या नियमित करून घ्याव्या. शरीरात रक्ताची कमतरता असल्यास डॉक्टरांशी संपर्क साधावा.

थायरॉईड

थायरॉईड हा महिलांमध्ये आढळणारा एक सामान्य आजार आहे. गर्भधारणेदरम्यान देखील, या रोगाचा धोका लक्षणीय वाढतो. अनेक प्रकरणांमध्ये महिलांमध्ये थायरॉईडचे प्रमाण जास्त वाढते. ज्याचा परिणाम मुलावरही होऊ शकतो. जर थायरॉईड नियंत्रणात नसेल, तर गर्भपात होऊ शकतो. अशा परिस्थितीत ही समस्या हलक्यात घेऊ नये.

# टक्कल वाढतंय? 'या' सवयी दूर करतील केस गळतीचा त्रास

वाढत्या वयानुसार शरीरातही काही बदल घडण्यास सुरुवात होते. वाढत्या वयाचे थेट परिणाम मेटाबॉलिजमवरही होताना दिसतात. तुमची त्वचा, नजर या साऱ्यासोबतच केसांचा पोतही बदलू लागतो. तुम्हाला माहितीये का, दर दोनपैकी एका व्यक्तीला वयाच्या ४० व्या वर्षापर्यंत केसगळतीच्या समस्येचा सामना करावा लागतो.



वयानुरुप केसगळतीचा सामना अनेकांनाच करावा लागतो. पण, काहींच्या बाबतीत हे प्रमाण जास्त असल्यामुळं ही चिंतेची बाब ठरते. केसगळतीच्या समस्येपासून दूर जाण्यासाठी तुम्ही काही सवयींमध्ये महत्त्वाचे बदल करणं अतिशय महत्त्वाचं असणार आहे. तुम्हीही या समस्येनं त्रस्त आहात का? आताच वाचा या वळणावर तुम्ही नेमकं काय करणं गरजेचं आहे...

डाएटमध्ये करा ड्ढीदूग्हे चा समावेश –

केसांची योग्य वाढ होण्यासाठी आहारात प्रोटीन्सचा समावेश करणं कधीही उत्तम. हेअर फॉलिकल्सही प्रोटीन्सपासूनच तयार झालेली असतात. आहारामध्ये या घटकाचं प्रमाण कमी झाल्यास बऱ्याचजणांना केस गळतीचा सामना करावा लागतो. यासाठी (Eww, Fish) अंड, मासे आणि कमी चरबीच्या मांसाहाराचा समावेश करा.

योग्य Vitamins -

डोक्यावरील त्वचेसाठी Vitamin अ बरीच मदत करतं. तर, Vitamin ए मुळं डोक्यावरील त्वचेमध्ये रक्ताभिसरण प्रक्रिया सुरळीत राहते.

घरगुती उपाय (ßXg rmñJo)–

अनेकदा घरातील काही लहानसहान गोष्टीसुद्धा तुमच्या केसगळतीच्या समस्येला दूर करु शकतात. लसुण, आलं आणि कांद्याचा रस केसांच्या मुळाशी लावून मसाज केल्यास त्याचा फायदाच होतो. काही आठवडे हा उपाय केल्यास केस गळतीची समस्या कमी होते. शिवाय केसांच्या मुळाशी मसाज केल्यामुळंही डोकं शांत होतं, डोळ्यांवरील ताणही कमी होतो.

डाएटमध्ये बायोटीनही हवंच–

बायोटीन किंवा %ग़ूरस्न्ह ँ७ सुद्धा केरेटीन उत्पादनासाठी फायद्याचं ठरतं. अंडी, ड्रायफ्रुटस, मुळा, कांदा, ओटस या पदार्थांमध्ये बायोटीनचं जास्त प्रमाण आढळतं.

सुयोग्य प्रमाणात झोप–

जेव्हा तुम्ही आराम करता, तेव्हा शरीरही काही पद्धतीत चुकलेली गाडी रुळावर आणत असतं. या परिस्थितीत ग्रोथ हार्मोन, सेल प्रोडक्शनही वेगात होतं. ज्यामुळं दररोज ८– ९ तासांची झोप आवश्यक ठरते. पुरेशी झोपही तुमच्या केसांची वाढ योग्य पद्धतीने होण्यास फायद्याची ठरते.

# भारताला विश्वगुरु बनविण्याचे ऐतिहासिक कार्य मोदीजी करतील - माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर : १८ व्या लोकसभेची ही निवडणूक देशाच्या जगाच्या दृष्टिने महत्त्वाची आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या कार्याच्या माध्यमातून शेतकरी सन्मान योजना, आरोग्य विमा, मुद्रा योजना अशा योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना सक्षम करण्याचे काम केलेले आहे. कोरोना काळात मोफत लस ८० टक्के जनतेला मोफत धान्य देऊन आधार देण्याचे काम केलेले आहे. युक्रेन–रशिया, इज्राईल पाम युध्दामुळे भारत देशाच्या आर्थिक परिस्थितीवर मोठा परिणाम झाला असून त्यामुळे –५७ लाख कोटीचे नुकसान झाले. भारताची जीडीपी –०.२६ टक्क्यावर आलेली आहे.तरीही अशा प्रतिकुल परिस्थितीमध्येही भारत देशाने चौफेर प्रगती करून २०१४ मध्ये ११ व्या क्रमांकावर असलेल्या भारत देशाला ५ व्या क्रमांकावर आणण्याचे काम मोदीजींनी केलेले आहे. भविष्यात भारत तिसर्या क्रमांकावर येईल असा विश्वास व्यक्त करीत विरोधकांना जे ७० वर्षात जमले नाही ते १० वर्षात करून दाखविण्याचे ऐतिहासिक काम मोदीजींनी केलेले आहे त्यामुळे यापुढील कालावधीतही आपल्या कार्यातून भारताला विश्वगुरू बनविण्याचे ऐतिहासिक कार्य मोदीजीच पूर्ण करतील असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.



सन २०१४ मध्ये भारत जगाच्या तुलनेत ११ व्या क्रमांकावर होता. कोरोना महामारी, युक्रेन–रशिया, इज्राईल–पाम महायुध्दाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर व प्रगतीवर मोठा परिणाम झाला. तरीही भारत चौफेर प्रगतीच्या माध्यमातून ५ व्या क्रमांकावर आलेला आहे. येत्या काळात तो तिसर्या क्रमाकावर येईल आणि १८ व्या शतकामध्ये स्वामी विवेकानंदांनी केलेली भविष्यवाणी खरी ठरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली २०३० मध्ये भारत महासत्ता बनेल असा विश्वासही भाजपा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्याहस्ते भारत माता, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकांनद यांच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सतीश यादव यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार अब्दूल गालिब शेख यांनी केले. यावेळी या कार्यक्रमाला बब्रूवान पवार, अनंत माने, युवराज वीर, बळीराम ढमाले, किसनराव लोमटे, जाजू शेठ, केदार पाटील, मंजूरखाँ पठाण, कैलास नागोलकर, नंदकुमार वलमपल्ले, कमलाकर बांडे, हानंमत दंडे, नितीन बुड्डे, बाबूराव मुंडे, प्रा.जयपाल घोगरे, सय्यद सय्योद्दिन अब्बास, नितीन शिंदे, सुभाष सोनवणे,माधवराव बोराडे, ललीत पाटील, तुकाराम पवार, अशोक बिडवे, भागवत घेवारे, हरिभाऊ कराड, चंद्रकांत भोसले, देवानंद भोसले, जनक माळी, भूजंग पाटील यांच्यासह जननायक संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जननायक संघटना ही सर्वसामान्यांच्या प्रश्नावर आवाज उठवून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून करीत आहे आणि कव्हेकर साहेबांच्या सुसंस्कृत आणि संघर्षशील नेतृत्वावर विश्वास ठेवून काम करण्याचे कार्य आपणही गेल्या ४० वर्षापासून करीत आहात. गेल्या वर्षभरामध्ये शहरातील ६० फुटी रोडची सहा दुकाने जळाली, सिलेंडर फुटुन नऊ मुले जखमी झाली. गेल्या दीड वर्षापासून लातूरकरांना पिवळे पाणी प्यावे लागत आहे.

## उपदेशकथा

### सावधगिरी

एक वृद्ध तपस्वी रानात खोपट बांधून चिंतन–मननात काळ व्यतित करत असत. पुढे तरुणपणीच विरक्ती आलेला एक चेला त्याला लाभला. कंदमुळे नि फळे खावी, झऱ्याचे पाणी प्यावे, वृक्षवल्लींना सोयरी मानून मग्न असावे, असा त्याचा दिनक्रम होता. एकदा गुरूवर्यांनी शिष्याला आज्ञा केली की, समोरच्या झाडावर चढ. शाल्मली वृक्ष होता. सरळसोट साग–शिष्याला वृक्षारोहणाचा सराव नव्हता. तो धीराने, धीमेपणाने चढू लागला. पावलागणिक गुरूस्मरण करत गेला. उंच शेंड्यापर्यंत पोहचला. उगवत्या सूर्यनारायणाचे दर्शन घेतले नि उतरू लागला. वृद्धाचार्य मौन धारण करून होते. सावकाशपणे पर्णराजीत लपलेल्या फांद्या पकडत शिष्य पर्णहीन खोडावर पाय ठेवणार एवढ्यात गुरुजींचा मौनभंग झाला. 'सांभाळ रे बाळा!' युवकाला विस्मय वाटला. एवढ्या उंचावर चढलो नि खबरदारीने उतरलो तेव्हा चकार शब्द नाही काढला नि आता भुईपाशी ठेपलो तेव्हा सांभाळून उतर म्हणतायत! हा काय अजब प्रकार! शिष्याच्या चेहऱ्यावरील गोंधळ गुरुजींच्या तेव्हाच ध्यानी आला. ते म्हणाले, 'बेटा, धोका समोर दिसत असतो तेव्हा प्रत्येक सुबुद्ध माणूस सावध असतो. त्याला इशारत लागत नाही. जेव्हा माणूस स्वत:ला सुरक्षित मानू लागतो, धोका संपला आता, असे समजू लागतो तेव्हा खरे तर धोका सुरू होतो. माझे केस पिकले, गात्रे थकली पण आजवर कुणालाही झाडाच्या शेंड्यावरून कोसळलेले पाहिलेले नाही. सारे घसरले खुशालजी, ते जमीन जवळ आली तेव्हा! जेव्हा ते गाफील झाले, सैल सुटले, निर्धास्त बनले तेव्हाच त्यांचे पाय घसरले. हे काही न सुटणारे कोडे नाही, तर कोड्यात टाकणारे जीवन आहे!'

कथा उपदेश : अखंड सावधानता असावी हेच खरे.

# ग्रामदैवत श्री सिद्धेश्र्वर व रत्नेश्र्वर देवस्थान महाआरती समिती प्रमुख पदी विशाल झांबरे

लातूर/प्रतिनिधी : ग्रामदैवत श्री सिद्धेश्र्वर व रत्नेश्र्वर मंदिरात दर सोमवारी होणाऱ्या महाआरती समितीचे प्रमुख म्हणून विशाल झांबरे यांची निवड करण्यात आली.



गेल्या कांही महिन्यांपासून श्री सिद्धेश्र्वर मंदिरात दर सोमवारी महाआरती करण्यात येते. यावेळी शेकडो भक्त व नागरिक उपस्थित असतात.

धार्मिक वातावरणात दर आठवड्याला हा सोहळा पार पडतो.यात अधिक सुसूत्रता यावी यासाठी विश्र्वस्त मंडळ व भक्त परिवाराच्या वतीने समितीच्या अध्यक्षपदी झांबरे यांची निवड करण्यात आली.

यावेळी प्रशासक एस.एस. जांबुतकर,आशिष साठे, सचिन आलमले,दत्ता सुरवसे,शिवानंद कातळे, गोवर्धन गाडेकर,तुकाराम जगताप आदींची उपस्थिती होती.समितीच्या प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल मान्यवरांनी झांबरे यांचे अभिनंदन केले . माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनीही झांबरे यांचे अभिनंदन केले असून ही सेवा अविरतपणे सुरू ठेवावी,अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. भाविकांनी या महाआरतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासक सचिन जांबुतकर यांनी केले आहे.

## (गुरु वचन)

## दुसऱ्यांचे उपकार विसरू नका

इसापनीतीतील एक छान गोष्ट आहे. एकदा एका जंगलामध्ये एक लांडगा राहत होता. तो अत्यंत खादाड आणि दुष्ट होता. त्याला एकदा खूप जोऱ्याची भूक लागली, त्याने जंगलातले अनेक प्राणी मारून खाल्ले. पण इथेच तो अडकला. एका प्राण्याला मारल्यानंतर त्याला खाताना त्याच्या घशात त्या प्राण्याचे हाड अडकले.

त्याने ते हाड काढायचा खूप प्रयत्न केला, परंतु त्याला यश मिळाले नाही. त्याच्या त्या प्रयत्नांनंतर त्याला खूप त्रास सुरू झाला. त्याला नेमके काय करावे हेच समजत नव्हते. त्याने सुरुवातीला भुरपुर पाणी पिले, परंतु त्याला यश मिळाले नाही. मग त्याने आपल्या इतर मित्रांना आपल्या घशातले हाड काढण्यास सांगितले. परंतु त्याच्या साऱ्या मित्रांनी त्याच्याकडे पाठ फिरवली.

शेवटी त्याला त्याच्या डोक्यावरून एक बगळा उडत जाताना दिसला. त्याने त्या बगळ्याला आपली व्यथा सांगितली. तो म्हणाला बगळ्या तू तुझ्या त्या लांब चोचीने जर माझ्या घशात अडकलेले हे हाड काढलेस तर मी तुला बक्षीस देईन, तुझे ते उपकार मी कधीही विसरणार नाही.

बगळ्याला त्याची दया आली. त्याने लांडग्याला मदत करण्याचे ठरवले. तो त्या लांडग्या जवळ आला आणि त्याने त्या लांडग्याच्या घशात आपली चोच घालून आपल्या चोचीने ते अडकलेले हाड काढले. यानंतर त्या बगळ्याने त्याला आपले बक्षीस मागितले, परंतु त्या धूर्त लांडग्याने त्या बगळ्याला चकमा देत तो तेथून फरार झाला.

यानंतर काही दिवसांनंतर पुन्हा एकदा त्या लांडग्याच्या घशात हाडाचा एक तुकडा अडकला, त्याला पुन्हा बगळा दिसला, परंतु बगळ्याने यावेळेस त्याला मुळीच मदत केली नाही कारण यापूर्वी त्याच्यावर केलेल्या उपकारांना तो लांडगा विसरला होता. म्हणून लक्षात ठेवा कधीही दुसऱ्यांनी केलेल्या उपकारांना विसरू नका.

# आदर्श शिक्षक गुरुदत पुरी यांचा सेवा निवृती गौरव

लातूर : जिजामाता माध्यमिक विद्यालय धर्मापुरी येथील आदर्श शिक्षण गुरुदत पुरी सर.यांचा सेवा निवृत्ती गौरव समारंभ संपन्न झाला.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव विजयकुमार नागरगोजे,प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक तथा महाराष्ट्र भूषण डाँ धर्मवीर भारती,भास्करराव नागरगोजे,प्रा.डाँ.दिलीप गित्ते,ईश्र्वर क्षीरसागर,जेष्ट नागरिक लक्ष्मण फड, शाळेचे मुख्याध्यापक रामहरी गित्ते,सामाजिक कार्यकर्ते अनिल पुरी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शाळेच्या वतीने.तसेच लातूर युवा प्रतिष्ठानच्या वतीने आदर्श शिक्षक गुरुदत पुरी यांचा सेवा निवृती निमित्त गौरव करण्यात आला.या प्रसंगी सत्कार मुर्ती गुरुदत पुरी सर,मुख्याध्यापक रामहरी गित्ते,डाँ धर्मवीर भारती,अनिल पुरी यांनी आपले विचार व्यक्त केले,कार्यक्रमाचे प्रास्तविक बालाजी आघाव,यांनी केले तर सुत्रसंचलन माणिक मुंढे,राजाभाऊ फड यांनी केले.या कार्यक्रमाला शिक्षक,पालक,गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्यासह विद्यार्थींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# मला भरभरून आशीर्वाद दिलात, तसाच आशीर्वाद डॉ. काळगे यांना द्या

लातूर : विधानसभा निवडणुकीत आपण सर्वांनी मला भरभरून आशीर्वाद देवून आमदार बनवले. असाच आशीर्वाद महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना देवून आपण त्यांना लोकसभेत पाठवावे, असे आवाहन 'लातूर ग्रामीण'चे आमदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी येथे केले. डॉ. काळगे यांच्या प्रचारात सर्वांनी हिरीरीने, एकजुटीने सहभागी व्हावे, असेही ते म्हणाले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मुरुड पंचायत समिती गणामधील विविध गावांतील काँग्रेस व महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ यांच्याशी महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या उपस्थितीत संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.

यानंतर निवळी (ता. लातूर) येथे पंचायत समिती गणातील निवळी, ढाकणी, बोरगाव बु., खंडाळा, गोंदेगाव, हिसोरी, त्यानंतर एकुर्गा येथे पंचायत समिती गणातील एकुर्गा, टाकळी शि., बोपला, चाटा, भोयरा, मुरुड अकोला, साखरा त्यांनतर चिंचोलीराव येथे पंचायत समिती गणातील चिंचोलीराव, चिंचोलीराव वाडी, विलासनगर, अंकोली, शिवूर, उटी खु., सावरगाव, धानोरी आदी गावांतील पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ यांच्याशी बैठक घेवून संवाद साधला.

आमदार धिरज देशमुख म्हणाले, केंद्र सरकारच्या तकलादू, फसव्या धोरणांमुळे उच्च शिक्षित तरुण बेरोजगार झाला आहे. हाताला काम नाही, रोजगाराची हमी नाही. नोकरीसाठी त्यांना वणवण भटकावे लागत आहे. अशीच स्थिती देशातील शेतकरी बांधवांची आहे. त्यांच्या शेतमालाला योग्य भाव नाही. त्यामुळे बळीराजा हैराण आहे. महिला असुरक्षित आहेत. समाजा–समाजात वाद वाढवले जात आहेत.

# राशीभविष्य ३० मार्च २०२४

मेष : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्‍चिम

मित्रांच्या सहकार्याने नवीन कामात यश मिळण्याचे योग आहेत. व्यापारात वेळेवर घेतलेले निर्णय फायदेशीर ठरतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर

कायद्याचे प्रकरणे सुटतील परंतु धैर्य व संयम बाळगणे आवश्यक आहे. योजनेनुसार काम केले तर फायदेशीर ठरणार आहे. व्यक्तिगत समस्या राहू शकते. व्यापार चांगला चालेल.

मिथुन : शुभ रंग: पिवळा,शुभ दिशा: उत्तर

आपला आहार वेळेवर घ्या. नौकरी व्यवसायात अडचणी येतील. आई–वडिलांच्या प्रकृतीची काळजी राहील. समाजात कुटुबात आपल्या कामाची अवेहलना होईल.

कर्क : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर

आपल्या कामाची लोक स्तुती करतील. कौटुंबिक सहकार्याने आपला दिवस चांगला जाणार आहे. कामकाजाच्या क्षेत्राचा विस्तार होईल. आरोग्याची काळजी घ्या.

सिंह : शुभ रंग :क़ेसरी,शुभ दिशा:उत्तर

कौटुंबिक वातावरण व आर्थिक परिस्थिती चांगली राहिल्याने आनंदी रहाल. आपल्या वस्तूची देखभाल करा. नौकरीमध्ये इच्छेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहेत.

कन्या : शुभ रंग: निळा, शुभ दिशा : पश्‍चिम

व्यवसायात यश मिळेल. दूरदर्शीपणामुळे अनेक अडचणींना व्यवस्थीत हाताळाल. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा. धार्मिक भावना वाढीस लागेल.

तुळ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर

अडकून पडलेली कामे पूर्ण होतील. जिवन स्थिर झाल्याचा आनंद मिळेल. मुलांच्या कामावर लक्ष द्या. व्यापारातील गोपनीय गोष्टी बाहेर बोलू नका.

वृश्‍चिक : शुभ रंग: पिवळा,शुभ दिशा: पूर्व

आळस झटकून कामाला लागा. जवळच्या व्यक्तिची भेट झाल्यामुळे आनंदी रहाल. नवीन योजना कार्यान्वयीत होईल. भागीदारीचा धंदा फायदेशीर राहील. अडकलेला पैसा मिळेल.

धनु : शुभ रंग केसरी, शुभ दिशा : उत्तर

राजकीय व्यक्तिपासून आपल्या कामात बदल होण्याची शक्यता आहे. कोणावरही विश्वास दाखवू नका. पैसा जमा करण्यासाठी येत असलेल्या अडचणी दूर होतील. व्यापार चांगला चालेल.

मकर: शुभ रंग: हिरवा,शुभ दिशा: पूर्व

आर्थिक तंगी निर्माण झाल्यामुळे मानसिक ताण वाढणार आहे. मुलांच्या कामाबल चिंता राहील. रोजगारातील परिस्थिती सामान्य राहणार आहे.

कुंभ : शुभ रंग :गुलाबी, शुभ दिशा :पूर्व

मानसिक अस्थिरता दूर होईल. सामाजिक कामात मान सन्मान मिळेल. जमीन, वाहन, मशीन यांच्या व्यवहारातून फायदा होईल. व्यापारात प्रगती राहील. मुलांच्या जीवनात समस्या निर्माण होण्याची शक्यता.

मीन : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्‍चिम

स्वत:चे निर्णय स्वत: घ्या फायदेशीर राहतील. मुलांच्या बाबतीत चांगले संदेश मिळतील. व्यापारात नवीन संबंध जुळतील. घराच्या संदर्भात काळजी राहील.

३० मे ला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर गुरू व बुधाचा प्रभाव आहे. तुमची बुध्दी तल्लख आहे. एखादी गोष्ट तर्काला पटल्याखेरीज तुम्ही तिचा स्वीकार करत नाही. लोकांशी वागतांना मात्र तुमचे वागणे भावनेने ओथंबलेले असते. सर्वांबल तुम्हाला आपुलकी प्रेम वाटते. इतरांची मने दुखावणे तुमच्या जिवावर येते. सत्कर्मांचे फळ चांगलेच मिळणार असा तुमचा विश्वास असतो. कायदा नीतिनियम सोडून तुम्ही सहसा वागत नाही. ऐहिक सुखांबरोबर तुम्ही आध्यात्मिक प्रगतीसाठीही उपासना साधना करता.

सर्वच लोक मनाने चांगले आहेत अशी समजूत करून घेऊ नका. नाहीतर लोक तुमच्या चांगुलपणाचा फायदा घेतील. जे उपकार स्मरतील अशानांच मदत करा. बैठ्या जीवनशैलीमुळे

# इतिहासात आजचा दिवस ३० मार्च

अंतरराष्ट्रीय

१८६७ – यूएसने रशियाकडून अलास्काला ७,२००,००० यूएस डॉलरमध्ये विकत घेतले.

१९५४ – वेस्ट इंडिजचे महान फलंदाज सर गॅरी सोबर्स यांचा इंग्लंड विरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण.

१९७२ – उत्तर व्हिएतनाम सैन्य तुकडीचे दक्षिण व्हिएतनाममध्ये प्रवेश.

१९९२ – पी.जे. पॅटरसन यांनी जमैकाचे सहाव्या पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला.

२००७ – पश्चिम आफ्रिका देश गिनीमध्ये समुद्र तटापासून काही अंतरावर एक नाव उलटून ६० जणांचा मृत्यू झाला.

२००७ – बांगलादेशात २००५ मधील बॉम्बस्फोट मालिका आणि दोन न्यायधीशांच्या हत्येच्या प्रकरणात दोषी ठरलेल्या जमातुल मुजाहिदीनच्या सहा अतिरेक्यांना फाशी देण्यात आली.

राष्ट्रीय

१९१९ – महात्मा गांधींने रोअल्ट ॲक्ट विरुद्ध आंदोलनाची घोषणा केली.

२००७ – इतर राज्यातील डॉक्टरांप्रमाणे अपणालाही मानधन मिळावे म्हणून संपावर गेलेल्या इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या दोनशे निवासी डॉक्टरांनी एकत्रितरित्या राजीनामा दिला.

२००७ – ओरिसाच्या तटाजवळ बंगालच्या खाडीत एक नौसेनेच्या जहाजाच्या माध्यमातून जमिनीवरुन जमिनीवर मारा करणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र 'धनुष्य'ची यशस्वी चाचणी करण्यात आली.

२००७ – भारतीय फिरकीपटू अनिल कुंबळेने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.

२००८ – दिल्ली उच्च न्यायालयाने अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचे माजी जनसंपर्क अधिकाऱ्याद्वारा दाखल केलेल्या याचिकेच्या आधारावर या संस्थेचे माजी संचालक डॉ. पी. वेणुगोपाल यांना नोटीस जारी केली.

जन्म

१४३२ – तुर्कीचे सुलतान मेहमेद दुसरा (फतेह) यांचा जन्म.

१७४६ – फ्रांसिस गोया, स्पॅनिश चित्रकाराचे जन्म.

१८३२ – व्हिंसेंट व्हान गॉ, डच चित्रकाराचे जन्म.

निधन

१६६५ – मुरारबाजी देशपांडे, छत्रपती शिवाजी महाराज यांचे विश्वासू सरदार(रणमरण) यांचे निधन.

१९४४ – सर चार्ल्स व्हर्नान बॉयस, विख्यात ब्रिटिश पदार्थविज्ञानशास्त्रज्ञाचे निधन.

१९७६ – रंगसम्राट रघुवीर शंकर मुळगावकर, प्रख्यात चित्रकाराचे निधन.

१९९३ – एस. एम. पंडित, भारतीय चित्रकाराचे निधन.

१९९८ – फर्डिनंड पोर्श, पोर्श, ए.जी. या प्रख्यात जर्मन कंपनीचा संस्थापकाचे निधन.

२००२ – आनंद बक्षी, हिंदी चित्रपटगीतकाराचे निधन.

२००२ – क्रिन मदर एलिझाबेथ, इंग्लंडची राणी एलिझाबेथ दुसरीची आईचे निधन.

## महात्मा बसवेश्र्वरमध्ये शिव-बसव वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन सुप्रसिद्ध हास्य विनोदी कलावंत राहुल भालेराव व प्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांची प्रमुख उपस्थिती

लातूर : महात्मा बसवेश्र्वर वरिष्ठ महाविद्यालयाचे शिव-बसव वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ दि. ३१ मार्च २०२४ रोजी स. ८ ते ५.३० वा. या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आले आहे.

या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये सुप्रसिद्ध हास्य विनोदी कलावंत राहुल भालेराव यांच्या हस्ते होणार असून निरोप समारोप आणि प्रमाणपत्र वितरण समारंभाला आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांची उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे उपस्थित राहणार असून विचारपीठावर प्रमुख अतिथी म्हणून वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजकुमार लाखादिवे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय पवार, एच. एच. सी. व्ही. सी.चे उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, विद्यार्थी परिषदेचे प्रभारी डॉ. कॅप्टन बाळासाहेब गोडबोले आणि कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिति राहणार आहे.

या वार्षिक स्नेहसंमेलनात आनंद नगरी, रंग लोकशाहीचानिमित्त रांगोळी व मेहंदी स्पर्धा, विविध गुणदर्शन (वैयक्तिक व समूह गायन आणि नृत्य), शेलापागोटे आणि स्नेह भोजन आदी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

## लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी उपक्रम



लातूर, : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांच्या आदेशानुसार स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून २३५- लातूर शहर मतदारसंघामध्ये सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी रोहिणी नेऱ्हे-विरोळे यांच्या मार्गदर्शनाखाली ३०७ शाळांमध्ये २६ मार्च २०२४ रोजी पालक मेळावे आयोजित करण्यात आले होते.

मतदार जागृतीसाठी पालक मेळावे या नाविण्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमार्फत पालकांमध्ये मतदानाविषयी जागृती करण्यात आली. यावेळी पालकांना मतदान करण्याबाबतचे संकल्पपत्र देवून मतदानाचे महत्व सांगण्यात आले. तसेच उपस्थित पालकांना जिल्हा निवडणूक कार्यालयामार्फत देण्यात आलेल्या पॉवर पॉईट प्रझेंटेशनद्वारे मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले. तसेच ७ मे, २०२४ रोजी न चुकता मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

शिक्षण क्षेत्रातील लातूर पॅटर्नप्रमाणे सर्वांनी हिरीरीने मतदान करुन लातूर लोकसभा मतदारसंघातील मतदान टक्केवारी वाढवून यामध्येही नवा लातूर पॅटर्न तयार करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांमार्फत आई-वडिलांना पत्र देवून प्रत्येक पालकांकडून मतदान करण्याबाबतचे संकल्पपत्र भरून घेण्यात आले. तसेच सर्व पालकांना मतदान करण्याबाबतची शपथ देण्यात आली.

## लातुर लोकसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद

लातुर - राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक



कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची इंडियन मेडिकल असोसिएशन शाखा लातुरच्या पदाधिकारी व सदस्यांसमवेत आज शुक्रवार दि.२९ मार्च रोजी सायंकाळी शहरातील बार्शी रोड भागात असलेल्या भारत डाईन हॉल या ठिकाणी सुसंवाद बैठक संपन्न झाली.

या बैठकीत बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की. डॉ शिवाजी काळगे यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सर्वच ठिकाणी त्यांच्या उमेदवारी चे स्वागत होत आहे आणि हे सर्व त्यांचा स्वभाव, त्यांच्यावर असलेले जनतेचं प्रेम यामुळे शक्य झाले.देशाचे स्वास्थ्य निरोगी राखण्यासाठी या लोकशाही च्या उत्सवात सर्वांनी उस्फुर्तपणे सहभागी व्हावे लागेल आपल्याला व्यक्त व्हावे लागेल कारण गेल्या १० वर्षात राज्यात आणि देशातील परिस्थिती अतिशय वाईट झाली आहे हे लक्षात घेता आजची परिस्थिती बदलून पुन्हा आपला महाराष्ट्र आपला देश पूर्वी सारखा व्हावा अशी प्रत्येकाची अपेक्षा आहे आणि त्यासाठी आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा लढा उभारावा लागेल असे आवाहन त्यांनी केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, ज्यांनी २५ वर्ष रुग्ण सेवा हीच ईश्र्वर सेवा मानून जनसेवा केली,लक्ष्मी नेत्र रुग्णालयात आजवर काही चुकीचे झाले नाही, रुग्णांच्या मनातील विश्र्वास,प्रेम, आपुलकीचे फलित म्हणजे डॉ शिवाजी काळगे यांना उमेदवारी जाहीर झाली असून अनेकांना शंका कुशंका असून डॉ शिवाजी काळगे यांना दिल्लीतील लोकसभेच्या दारापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी आपली आहे असे म्हणत उपस्थिताना आश्र्वस्त केले.

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, पुणे,मुंबई पेक्षा जर लातूरचे आधीक विद्यार्थी नीट परीक्षा उत्तीर्ण होत असतील तर मग लातूरला गुणवत्तेच्या निकषावर एम्स व्हायला हवे आणि त्यासाठी डॉ शिवाजी काळगे यांना निवडून देऊन आपण सर्वांनी एकत्र येऊन यासाठी प्रयत्न करावे लागतील असे म्हणत आपल्या कामकाजाला सांभाळून आपण पुढील प्रचार आणखी चांगला कसा असेल यावर चर्चा करून नियोजन केले जाईल आपण सर्वांनी खंबीरपणे डॉ शिवाजी काळगे यांच्या पाठीशी उभे राहून प्रचंड मताधिक्य मिळवून द्यावे असे आवाहन केले.

यावेळी बोलताना लातुर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख म्हणाले की, लोकशाहीत आपन कसे राहिले पाहिजे, कसे वागले पाहिजे, प्रत्येकाला मिळणारे अधिकार हे समान आहेत आणि हे सर्व आपल्या राज्य घटनेमुळे आपल्या देशातील लोकशाहीमुळे पण आज देशातील परिस्थिती पाहता लोकशाही अस्तित्वात आहे की नाही असाच प्रश्र्न आपल्या मनात येतो. आज देशातील लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी आपल्याला आपला लोकप्रतिनिधी म्हणून डॉ शिवाजी काळगे यांना संसदेच्या नवीन इमारती मध्ये पाठवावे लागेल.आजची व्यवस्था बदलण्यासाठी आणि जी आपल्या महापुरुशाणी निर्माण केली होती ती परत आणण्यासाठी आपल्याला धाडस करावे लागेल अन्यथा आपल्याला आपली येणारी पिढी माफ करणार नाही याचा विचार आज आपण करावा लागेल.

पुढे बोलताना ते म्हणाले की, वैद्यकीय क्षेत्रातील मुळ तत्व काय आहे तर आपला रुग्ण वाचला पाहिजे त्यासाठी आवश्यक प्रयत्न केले जातात असेच प्रयत्न आपल्याला करावे लागतील लातूरला देखील एम्स झाले पाहिजे, वैद्यकीय क्षेत्रातील नवनवीन प्रकल्प लातुर मध्ये यायला हवेत यासाठी काळाची गरज ओळखून आणि आपल्या देशाची लोकशाही वाचविण्यासाठी येणाऱ्या ७ मे रोजी आपण डॉ.शिवाजी काळगे यांना मत देऊन प्रचंड मताधिक्याने लोकसभेत पाठवावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख साहेबांनी जे विचार दिले त्या विचाराने राजकारनात आम्ही सरळ चालत आहोत आम्ही ट्रॅक सोडणार नाही आमची चाल ही हत्ती सारखी सरळ असून जे येतील त्यांना घेऊन जे येणार नाहीत त्यांना सोडून हे ब्रीद घेऊन आपण कामाला लागावे असेही आवाहन त्यांनी केले.

यावेळी बोलताना डॉ शिवाजी काळगे म्हणाले की, सण २०१४ आणि २०१९ असे दोन वेळा प्रयत्न केले पण जे जमले नाही ते आज २०२४ लोकसभा निवडणूक निमित्ताने जमले ते माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्यामुळे आणि आज या ठिकाणी जमलेले माझे बांधव व भगिनींचे प्रेम मिळाले हेच मी माझे भाग्य समजतो.सद्याची राजकीय परिस्थिती लक्षात घेता आपल्या सारख्याने राजकारणात जाणे मला योग्य वाटत नव्हते पण माजी मंत्री आमदार अमित देशमुख आणि माझे कुटुंबिय,मित्र परिवार यांच्या पाठिंब्यामुळे मी धाडस केले आहे. आपण दिलेल्या प्रेमाच्या जोरावर आपण नक्की यशस्वी होऊ असा विश्र्वास व्यक्त करीत अशीच खंबीर साथ कायम द्यावी असे आवाहन त्यांनी उपस्थिताना केले.

प्रास्ताविक करताना डॉ.कल्याण बरमदे म्हणाले की, आपल्या वैद्यकीय क्षेत्रातील एक सहकारी लातुर लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने लातुर लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवार म्हणून आपल्याला मिळालेले आहेत ते स्वच्छ प्रतिमे.

### रंग बरसे ..

बुरा न मानो होली
पुढारी आले रंगात
रंग लावायला मला
घुसले एकेक घरात
हिरवा निळा भगवा
रंग पिवळा हातात
रंग ज्यांनी लावला
गेलो त्या त्या पक्षात
चेहरा मुळ कोणता
राहिले नाही लक्षात
रंगी बेरंगी रंगलेला
भूत भासलो साक्षात
उचलले खांद्यावरती
जणूमी असे जामात
केवढा माझासन्मान
मन हरवले कोमात
आंघोळ सर्वां नावाने
आलो मुळच्या रंगात
जबाबदार नागरिक
सभ्यता पुन्हा अंगात
सर्व सामान्यमतदार
व्यग्र माझ्या कामात
बसले ते खुर्ची वरती
सत्ता भोगी आरामात

**२)**

### हमी ..

परवलीचा हा शब्द
गॅरन्टी आणि हमी
डाव देणारं जिंकून
पत्ता वाटतो हुकमी
शब्द खात्री देण्यास
कुणीही नाही कमी
प्रत्येकाच्यापोटामधे
वळवळ करते कृमी
आपण करु अजेंडा
वाढू लागे खुमखुमी
लोकांच्याआठवणी
उडू लागते धुमधुमी
रे पुढल्या पिढीसाठी
करून ठेवा रे बेगमी
गच्च भरो मतपेट्या
व्यस्त सगळे उद्यमी
दुजांना देतात वारंटी
स्वतांची नसता हमी
माहिती नाही कसली
कधीलागेल लिलामी
राजकारणी कौटिल्य
व्यक्तीत्व बहुआयामी
तरीही सत्य हे उघडे
कोण आहे अंतर्यामी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## मुलांचे मौखिक आरोग्य निरोगी राखण्यासाठी सुरुवातीपासून काळजी घ्या डॉ. महेश दडपे यांचे आवाहन



लातूर, - मौखिक आरोग्य हे सामान्य आरोग्या इतकेच महत्त्वाचे आहे. खराब मौखिक आरोग्य हे इतर रोगांशी जोडलेले असून ते अनेक गंभीर आजारांना निमंत्रण देऊ शकते. त्यामुळे लहान मुलांचे मौखिक आरोग्य निरोगी राखण्यासाठी सुरुवातीपासून त्यांचे दात, हिरड्या व संपूर्ण मुखाची नियमित स्वच्छाता ठेऊन काळजी घ्यावी, असे आवाहन, बाल दंत रोग तज्ज्ञ प्रा. डॉ. महेश दडपे यांनी केले. येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील बाल दंत रोग विभाग येथे जागतिक मौखिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. महेश दडपे बोलत होते. यावेळी बाल दंत रोग तज्ज्ञ डॉ. निलोफर शेख, डॉ. प्राजक्ता गायकवाड, डॉ. सायली मुंडे उपस्थित होत्या.

यावेळी पुढे बोलताना डॉ. महेश दडपे म्हणाले की, मानवी शरीराचा आरसा म्हणून मुखाकडे पाहिले जाते. तोंड, दात आणि शरीर यांचा परस्पर सबंध असल्याने त्यांच्या आरोग्यावर संपूर्ण शरीराचे आरोग्य निर्भर आहे. त्यानुसार यावर्षीच्या मौखिक आरोग्य दिनाची थिम ही 'आनंदी मुखआनंदी शरीर' अशी असून प्रत्येकाने आपल्या मौखिक आरोग्याची नियमित काळजी घेतल्यास मौखीक आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल. मुखाचे आरोग्य चांगले नसेल तर मुखात विविध व्याधी जडू शकतात. मुख स्वच्छतेकडे सातत्याने दुर्लक्ष झाल्यास हिरड्यांना सुज येणे, हिरड्यांतून रक्त, पू येणे, दात हालणे, दात पडणे, दात किडणे, मुख दुर्गंधी, थंड, गरम, तिखट खावू न देणे अशा स्वरुपातील विकार जडू शकतात. या समस्यांवरती वेळीच प्रतिबंध घातला नाही तर त्याचा परिणाम संपूर्ण शरीरावर दिसून येतो. परिणामी त्यामुळे अनेक दुर्धर आजार उद्भवू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार मौखिक रोग जगभरातील ३.५ अब्ज लोकांना प्रभावित करीत असून ते वेदना, अस्वस्थता, विकृती आणि अगदी मृत्यूस कारणीभूत ठरू शकतात. दात व मुखाबाबतच्या अस्वच्छतेच्या सवयी, सतत खाण्याची सवय, विशेषता गोड पदार्थांचे सेवन या कारणांमुळे दंत क्षय होण्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे जंक फुड, चॉकलेट, बिस्कीट, डबाबंद ज्युस यांचे सेवन टाळावे व फळे, पालेभाज्या, प्रथिनेयुक्त अन्नपदार्थ आहारात समावेश करावा, फ्लोराईडयुक्त टुथपेस्टचा वापर करावा, दर सहा महिन्यांनी दंत रोग तज्ज्ञांकडून दंत तपासणी करुन घ्यावी. जर सुरुवातीपासून लहान मुलांच्या दातांची पालकांनी काळजी घेतली तर भविष्यात मुख, दंत रोगांना सामोरे जावे लागणार नाही, असेही डॉ. दडपे म्हणाले.

## विद्यार्थ्यांना संशोधनामध्ये करिअरच्या व फंडिंगच्या अनेक संधी - पॉंडिचेरी विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.अनिल के.भटनागर

लातूर : शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षण घेण्यामागचा उद्देश व शिक्षणाचा प्रवास निश्र्चित करावा.जीवनात कितीही अपयश,निराशा आली तर ते आव्हान समजून आपली उद्दिष्टे पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.भौतिकशास्त्र हा विषय अत्यंत महत्त्वाचा असून क्रिस्टल स्ट्रक्चर,कॉंटम फिजिक्स तसेच इलेक्ट्रॉनिक्स विषयातला काही भाग जसे की,पावर सप्लाईस, पावर कन्वर्टर,सोलर पावर असे विविधांगी ज्ञान विद्यार्थ्यांनी घ्यावे.विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्समध्ये संशोधनासाठी भरपूर संधी उपलब्ध आहेत आणि वेगवेगळ्या फंडिंग एजन्सीपासून आपल्याला रिसर्चकरीता फंड देखील प्राप्त होतो. म्हणूनच विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण संशोधन करून करिअर घडविले पाहिजे.याबरोबर शिक्षकांचे कर्तव्य फक्त वर्गात जाऊन शिकवून परत येणे एवढेच नाही तर प्रत्येक विद्यार्थ्यांच्या गरजा काय आहेत,त्या पूर्णपणे समजून घेऊन त्यांना मानसिक आधार आणि भविष्यात स्वावलंबी बनण्यासाठी देखील मदत करणे गरजेचे आहे,असे प्रतिपादन पॉंडिचेरी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.अनिल के.भटनागर यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग व इंडियन अकादमी ऑफ सायन्सेस,बेंगळुरू,भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमी,नवी दिल्ली आणि राष्ट्रीय विज्ञान अकादमी,प्रयागराज यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२६ ते २८ मार्च २०२४ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ’विज्ञान




अकादमीच्या भौतिकशास्त्रावरील तीन दिवसीय व्याख्यान कार्यशाळेचा समारोप झाला.यावेळी ते कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,कार्यशाळा समन्वयक माजी प्राचार्य आर.एच.लड्डा,भौतिकशास्त्र विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी,कार्यशाळा सहसमन्वयक व इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ.टी. एच.मुजावार यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे असे म्हणाले की,विद्यार्थी केंद्रबिंदू मानून त्यांच्या सर्वांगीण विकास व ज्ञानासाठी सदरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली.या कार्यशाळेतील व्यक्तींनी केलेले मार्गदर्शन व अद्ययावत ज्ञानाचा फायदा विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यासाठी निश्र्चितच होईल.माजी प्राचार्य आर.एच. लड्डा हे ऐंशी वर्षाचे वय झालेले असतानाही सेवानिवृत्तीनंतर दयानंद शिक्षण संस्था व दयानंद विज्ञान महाविद्यालयासाठी विविध कार्यक्रम,उपक्रम आणि इन्स्पायर शिबिराचे सातत्याने आयोजन करतात,ही बाब खूपच प्रेरणादायी व आदर्श आहे.अशा या निस्वार्थी भावनेतूनच केलेल्या कार्यामुळे विद्यार्थी घडतात.

सूत्रसंचालन गौरी जाजू या विद्यार्थीनीने केले तर आभार कार्यशाळा समन्वयक माजी प्राचार्य आर. एच.लड्डा यांनी मानले.कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे तज्ज्ञ प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांचेही प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.अनिल जाधव,वैष्णवी साठे,विश्र्वजा खाडप व साक्षी बांगड या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेतील तीन दिवसीय अनुभव सांगितले.प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रही वितरित करण्यात आले.याप्रसंगी प्रा.गोपाल अवस्थी,प्रा.मेघा आजाम,डॉ.रामशेट्टी शेटकार,विष्णू नाईकवाडे,सुदर्शन काळे,पांडुरंग यमपुरे,राजू पांचाळ,हरिओम पाटोळे यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि दयानंद विज्ञान महाविद्यालय,राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर,संजीवनी महाविद्यालय,चापोली,शिवाजी महाविद्यालय,रेणापूर,योगेश्र्वरी महाविद्यालय,अंबाजोगाई येथील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात दिव्यांग मतदारांना संकल्प पत्र प्रदान

लातूर : सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, ४१-लातूर लोकसभा मतदारसंघ (अ.जा.) तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, लातूर यांच्या मार्गदर्शनानुसार २३५-लातूर शहर मतदार संघ स्वीप अंतर्गत महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात मतदार जागृती रॅली काढणे, विविध स्पर्धा आयोजन करणे, असंघटित कामगारांचे पथनाट्यद्वारे प्रबोधन करणे, रंग लोकशाहीचा अंतर्गत मतदार जागृती टयटू, टोप्या तयार करणे, मतदार जागृतीसाठी ग्रिटींग बनविणे, चित्रकला स्पर्धा, रागोळी स्पर्धा आणि रंग भरण स्पर्धा, भारत भाग्य विधाता गट स्थापन करणे, स्वाक्षरी मोहीम, सेल्फी पॉईंट तयार करणे, दिव्यांग मतदारांना संकल्प पत्र देणे आणि चुनावी पाठशाला अशा दहा कलमी कार्यक्रमांद्वारे २३५-लातूर शहर मतदार संघ स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. आज षडानंद वाघमारे, अनिरुद्ध कांबळे, आनंद मानकोस्कर, प्रशांत सुरवसे, अंकुश मोरे, अथर्व जोशी, दत्ता रणखांब, यांची उपस्थिती होती.

## ठसका

खायाला सगळे एकत्र असतात
दाखवायला मात्र वेगळी चूल असते
प्रलोभण, आमिष, आश्र्वासन
हीच तर मतदारांना भूल असते
शिक्षण,आरक्षण हिरावणे हेच
सत्ता काबीज करण्याचा रुल असते
लोकांना धर्मांध बनवणे हाच तर
मतदारांना भुलवण्याचा पूल असते
एका दिवसासाठी मूर्ख बनणे
म्हणजे एप्रिल फुल असते
अन पाच वर्षासाठी मूर्ख बनणे
म्हणजे कमळाचं फुल असते

**- विजय वाठोरे, हिमायतनगर नांदेड**
**९९७५५९३३५९**

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894